नि. फौजदारी खटला क्र.१९६ /२०२३

महाराष्ट्र शासन/ नामदेव राठोड

निशाणी क्र.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी शपथेवर सुरू...**

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख–याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव** : बालासाहेब धनसिंग पवार

**वय** : ५० वर्षे,

**व्यवसाय** : शेती,

**पत्ता** : रा.घारगाव, ता. कळंब, जि. धाराशिव.

**साक्षीदार क्र.१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैद्य यांचे मार्फत**

१. दिनांक ३०/११/२०२२ रोजी शिराढोण पोलीस स्टेशन यांनी मला पोलीस स्टेशन येथे बालावले नव्हते. मी हॉटेलमध्ये बसलो असताना पोलीसांनी घारगाव येथील चौकामध्ये मला बोलावून माझी सही घेतली. पोलीसांच्या सांगण्यावरुन मी त्यांनी दिलेल्या कागदावर सही केली होती. मला लिहता वाचता येत नसल्याकारणाने मला त्या कागदावरील मजकूर माहित नाही. आता मला अभिलेखावरील जप्ती पंचनामा

दाखविण्यात आला. त्यावरती अनुक्रमांक २ वरती माझी सही आहे. सदर सहीस **नि.क्र. १५** देण्यात येत आहे.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/११/२०२२ रोजी शिराढोण पो.स्टे. येथे मला पंचनाम्याकरीता बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझेसोबत दुसरा पंच बंडु जाधव हा देखील होता. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयात वापरलेला एक लाकडाची मुठ असलेला त्यास ८ से.मि. पाते असलेला व पाते टोकाचे बाजूस टोकदार असलेला चाकू व लाल रंगाची एका बाजूस फुटलेली त्यावर काळसर रंगाचा डाग असलेली वीट अशा दोन वस्तू पोलीसांनी मी व दुसरा पंच नामे बंडु यांच्यासमक्ष जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या वस्तू जप्त करुन पोलीसांनी जप्ती पंचनामा हा आमच्या समक्ष तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या समक्ष तयार केलेला जप्ती पंचनामा आम्हाला वाचून दाखवुन त्यांनतर त्यावरती सहया घेतल्या.

नि. फौजदारी खटला क्र.१९६ /२०२३

महाराष्ट्र शासन/ नामदेव राठोड

निशाणी क्र.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी नामदेव हा माझ्या गावचा म्हणजेच घारगावचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी आरोपी नामदेव याच्या सोबतच न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपीच्या सांगण्यावरुन न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. डी.एस. पवार यांच्यामार्फत...**

उलटतपास नाकारला.

**फेरतपास काही नाही.**

**Sd/-**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**दिनांक: ०५.०७.२०२५**
**ठिकाण: कळंब**

**(श्रीमती ए.डी. जाधव)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**
**(कोर्ट क्र.३)कळंब.**